सुधारित प्रादेशिक योजना - नागपूर
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) (ग) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - १६ फेब्रुवारी, २०१६.

**शासन निर्णय:-** सोबतची अधिसूचना (मराठी / इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. * MANTRALAYA, MUMBAI-32 * सत्यमेव जयते

(अविनाश पाटील)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
४) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
५) जिल्हाधिकारी, नागपूर.
६) सह सचिव (नगररचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
८) सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणित करण्यात यावयाच्या भाग नकाशाच्या ०५ प्रती शासनास सत्वर सादर कराव्यात.)
९) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात येऊन त्याच्या प्रत्येकी ०५ प्रती या विभागास, संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व विभागीय सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे पाठवाव्यात.)
१०) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचना शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.)
११) निवड नस्ती (कार्यासन, नवि-९)

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - १६ फेब्रुवारी, २०१६

## अधिसूचना

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

क्रमांक:टिपीएस-२४१५/१८२/प्र.क्र.९८/२०१५/नवि-९: ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६/२६४३/ प्र.क्र.३००(अ)/९७/नवि-९, दि. ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजुर झाली असुन ती दि. ०१ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील, नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पास (यापुढे "उक्त मेट्रो" असे संबोधले आहे) राज्य शासनाने निर्णय क्र. नासुप्र-३३१३/प्र.क्र.४१/नवि-७, दि. ३० जानेवारी, २०१४ अन्वये तर केंद्र शासनाने पत्र क्र. के-१४०११/२४/२०१३-एमआरटीएस-४, दि. ११ फेब्रुवारी, २०१४ नुसार तत्वत: मान्यता दिलेली असून पत्र क्र. के-१४०११/(एन-१)/२०१४/एमआरटीएस-३, दि. २१ ऑगस्ट, २०१४ अन्वये अंतिम मान्यता दिली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त मेट्रोचे संरेखनाखालील जागेपैकी (यापुढे "उक्त जमिनी" असे संबोधले आहे) काही जमिनी वाणिज्य / रहिवास / सार्वजनिक निमसार्वजनिक / औदयोगिक व ना विकास विभागात समाविष्ट आहेत तर काही जमिनी काही आरक्षणांनी बाधित होत आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्यानुसार, उक्त जमिनीत मेट्रो संरेखन (मार्गिका, स्थानके, वाहनतळ, वाणिज्य विभाग यासह) दर्शविणे (यापुढे "प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे) व्यापक जनहिताच्या दृष्टीने आवश्यक झाले आहे, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार शासनाने, प्रस्तावित फेरबदलाच्या अनुषंगाने जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रस्तुतची सूचना दि. ६/९/२०१४ रोजीच्या शासन राजपत्रात प्रसिध्द करुन तसेच वृत्तपत्रात प्रस्तावित फेरबदलासंदर्भात प्राप्त होणाऱ्या सूचना / हरकतींवर सुनावणी देण्यासाठी विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांची, उक्त अधिनियमाचे कलम १६२ (१) अन्वये अधिकारी म्हणून नियुक्ती केली ;

आणि ज्याअर्थी, नियुक्त अधिकारी यांनी दि. २३ एप्रिल, २०१५ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केलेला आहे. तद्नंतर आवश्यक त्या चौकशीअंती व संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलापैकी वाहनतळ, स्टेशन्स व वाणिज्य वापरा करीताच्या बदलांना तुर्तास प्रतिक्षाधिन ठेवण्याचे व फक्त मेट्रो लाईन संरेखन (मार्गीका) दर्शविणे पुरते बदलास मान्यता देण्याचे शासनाचे मत झाले आहे ;

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उपकलम (१कक) (ग) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास खालील प्रमाणे मान्यता देत आहे.

फेरबदल

"मेट्रो लाईन संरेखन (मार्गीका) (नकाशात दर्शविल्याप्रमाणे) संबंधी फेरबदल मान्य करण्यात येत आहे, व वाहनतळ, पार्कींग व स्टेशन्स चे फेरबदल प्रतिक्षाधिन ठेवण्यात येत आहे."

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा, प्रस्तुत अधिसूचनेसह, जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत १ महिना कालावधीसाठी उपलब्ध राहील.

१. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
२. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
३. विभागीय सह संचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.

प्रस्तुत अधिसूचना शासनाच्या www.maharashtra.gov.in व नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा प्रसिद्ध करण्यात यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

( रा. शा. चौहान )
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai – 400 032.**
**Date – 16th February, 2016**

## NOTIFICATION

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

**No.TPS-2415/182/CR-98/2015/UD-9:-** Whereas, the Revised Development Plan of Nagpur City has been sanctioned by the Government vide Urban Development Department's Notification No. TPS-2496/2643/CR-300(A)/97/UD-9, dated the 7th January, 2000 and has come into force with effect from the 1st March, 2000 (hereinafter referred to as "the said Development Plan") under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act. No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, the State Government has accorded approval in principle to the Nagpur Metro Rail Project (hereinafter referred to as "the said Metro") vide Government Resolution No. NIT-3313/CR-64/UD-7, dated the 30th January, 2014 and the Central Government also has accorded its 'in-principle' approval vide its letter No. K-14011/24/2013-MRTS-IV, dated the 11th February, 2014 and accorded its final approval vide its letter No. K-14011/(N-1)/2014-MRTS-III, dated the 21st August, 2014 ;

And whereas, in the said Development Plan, the lands under the proposed alignment of the said Metro (hereinafter referred to as "the said Lands"), are partially included in Commercial / Residential / Public Semi-Public / Industrial / No Development Zone, and are affected, in parts, by some reservations ;

And whereas, the Government is of the opinion that, in the public interest, it is necessary to urgently incorporate the alignment of the said Metro along with Route, Stations, Parking's and Commercial Zone, on the said Lands, as shown on the plan appended hereto (hereinafter referred to as "the Proposed Modification") ;

And whereas, in exercise of the powers vested under Section 37(1AA) of the said Act, the Government has published the notice for inviting suggestions and objections from the general public in respect to the Proposed Modification, in the official Gazette dt. 6/9/2014 as well as in the newspaper and for hearing suggestions / objections received in respect of the Proposed Modification, appointed the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur, as the Officer under section 162(1) of the said Act. ;

And whereas, the appointed Officer has submitted his report to the Government on 23rd April, 2015, and after making necessary inquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government finds it expedient that out of the proposed Modification, the modifications in respect of parking, commercial zone and Metro Station be kept in abeyance and only the modification in respect of the Metro Alignment should only be sanctioned.

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub section (1AA)(C) of section 37 of the said Act, Government hereby, sanctions the proposed modification accordingly and for that purpose amends the said Development Plan as follows ;

**"Modification"**

"The modification in respect of Metro Alignment (as shown on the plan) is sanctioned and the modification in respect of Parking, Commercial Zone and Stations is kept in abeyance"

The Plan showing the Proposed Modification along with this Notice, shall be kept open for inspection of the general public, at the following offices on all the working days for the period of one month.

1) The Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur.
2) The Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur.
3) The Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur.

This Notice shall also be available on the Government web site at www.maharshtra.gov.in

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

(R. S. Chouhan)
**Section Officer to Government**